३२५
०१-०९-२१
११:३० PM

# उल्हासनगर महानगरपालिका उल्हासनगर
## सार्वजनिक बांधकाम विभाग

दिनांक : ०१/०९/२०२१

**विषय :- उल्हासनगर-५ येथील बँक ऑफ इंडिया ते बॅरेक नं.२०४६ पर्यंतच्या रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे या कामाच्या निविदा प्रक्रियेत पात्र/अपात्र निविदाकारांची माहिती संकेतस्थळावर प्रसिध्द करणेबाबत...**

**संदर्भ :- ई निविदा क्र. 2021_UMC_६९६९२६_१**

उल्हासनगर-५ येथील बँक ऑफ इंडिया ते बॅरेक नं.२०४६ पर्यंतच्या रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे या कामाच्या ई निविदा क्र. ६९६९२६_१ नुसार निविदा प्रक्रिया सुरु आहे. सदर ई निविदा प्रक्रियेचा दिनांक ०४/०८/२०२१ रोजी तांत्रिक भाग उघडण्यात आला. यामध्ये १) मे. जय भारत कंस्ट्रक्शन २) मे. एम.सी.चंदनानी कंन्स्ट्रक्शन ३) मे.झा.पी. ॲन्ड कंपनी ३) मे. साई सिध्दनाथ कंस्ट्रक्शन यांनी निविदा सादर केल्या आहेत.

मे.झा.पी.ॲण्ड कंपनी यांनी अशी तक्रार केली आहे की, मे.साई सिध्दनाथ यांनी निविदेकरीता अपलोड केलेले कागदपत्र स्पष्ट नसून असदृश्य आहेत. सदर तक्रार प्राप्त झाल्यानंतर वरील चारही निविदाकारांना त्यांचे मुळ कागदपत्र तपासणी साठी कार्यालयात सादर करणेबाबत पत्र दिले. पत्रात असे स्पष्ट नमुद केले आहे की, जे कंत्राटदार मुळ कागदपत्र सादर करणार नाहीत, त्यांची निविदा अपात्र ठरविण्यात येईल. दिनांक २७/०७/२०२१ पर्यंत कोणीही कागदपत्र सादर केले नसल्याने पुनश्च दिनांक ३० जुलै,२०२१ रोजी वरील चारही कंत्राटदार यांना मुळ कागदपत्र सादर करणेसंदर्भात स्मरणपत्र देण्यात आले.

दिनांक ०२/०८/२०२१ रोजी १) मे.झा.पी.ॲण्ड कंपनी २) मे.एम.सी.चंदनानी कंन्स्ट्रक्शन ३) मे.जय भारत कंन्स्ट्रक्शन हे कंत्राटदार मुळ कागदपत्रांसह कार्यालयात आले असता, संबंधित उप-अभियंता यांनी मुळ कागदपत्रांची तपासणी केली आहे. तसा अहवाल उप-अभियंता यांनी सादर केला आहे. तथापी, यामध्ये मे.साई सिध्दनाथ कंन्स्ट्रक्शन यांनी विहित मुदतीत मुळ कागदपत्र तपासणीकरीता सादर केलेले नाही. त्यामुळे मे. साई सिध्दनाथ यांना अपात्र ठरविण्यात येत आहे.

**पात्र निविदाकार**

१) मे.झा.पी.ॲण्ड कंपनी

२) मे.एम.सी.चंदनानी

३) जयभारत कंन्स्ट्रक्शन

**अपात्र निविदाकार**

१) मे.साई सिध्दनाथ (अपात्रतेचे कारण :- मुळ कागदपत्र विहित मुदतीत छाननी करीता सादर केले नाही.)

वरीलप्रमाणे पात्र /अपात्र निविदाकारांची माहिती दिनांक ०२/०९/२०२१ रोजी सायं.४.०० वाजेपासून ते ०६/०९/२०२१ सायं ४.०० वाजेपर्यंत www.umc.gov.in या संकेतस्थळावर सदर कालावधीकरीता प्रसिध्द करण्यात येत आहे. याबाबत हरकती / सुचना असल्यास सार्वजनिक बांधकाम विभागाचे ulhasnagar.pwd@gmail.com या मेलवर अथवा शहर अभियंता यांचे कार्यालयात लेखी स्वरुपात सादर कराव्यात.

शहर अभियंता
उल्हासनगर महानगरपालिका.